महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९५ वे | दिनांक : ०९/०७/२०२६ | वार : गुरुवार

## महाराष्ट्रात 'व्यवहारिक मराठी' अनिवार्य : प्रवासी सुरक्षेसह भाषिक स्वाभिमानाचा नवा अध्याय



**मुंबई :** "मराठी ही कोणाला दूर करणारी भाषा नाही, तर माणसाला माणसाशी जोडणारी भाषा आहे." या भावनेतून महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांसाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, २२, ७८ आणि ८५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या असून, १६ ऑगस्ट २०२६ पासून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अधिसूचना ८ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात निवेदनाद्वारे दिली.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी विचारांची आणि समृद्ध मराठी संस्कृतीची भूमी आहे. रोजगाराच्या शोधात देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे महाराष्ट्राने नेहमीच खुले मनाने स्वागत केले आहे. मात्र, राज्यातील जनतेशी संवाद साधण्या इतपत व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही केवळ कायदेशीर अट नसून सामाजिक बांधिलकी देखील आहे.

हा निर्णय कोणत्याही भाषे विरोधात नसून कोट्यवधी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, सुलभ संवादासाठी आणि ग्राहकाभिमुख सार्वजनिक सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे. चालक आणि प्रवासी यांच्यातील स्पष्ट संवादामुळे गैरसमज कमी होतील, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळेल आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थे वरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी परिवहन विभागाने मागील काही महिन्यांपासून राज्यव्यापी प्रशिक्षण मोहीम राबविली आहे.

कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग यांच्या सहकार्याने हजारो अनुभवी शिक्षकांची फळी तयार करण्यात आली. राज्यभरातील विविध प्रादेशिक परिवहन कार्यालये, प्रशिक्षण केंद्रे तसेच चालकांच्या सोयीच्या वेळेनुसार व्यवहारिक मराठीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

या प्रशिक्षणासाठी दैनंदिन सेवेत उपयुक्त ठरणारी वाक्यरचना, प्रवाशांशी नम्र संवाद, दिशा, ठिकाणे, भाडे, आपत्कालीन प्रसंग तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांशी प्रभावी संवाद साधण्यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. सोप्या पुस्तिका, संवाद माला आणि प्रशिक्षण साहित्याच्या माध्यमातून मराठी शिकणे सहज, सोपे आणि आनंददायी व्हावे, यावर विशेष भर देण्यात आला आहे.

"महाराष्ट्रात रोजगार करणाऱ्या प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगावा; मात्र महाराष्ट्राच्या मातृभाषेलाही मनापासून स्वीकारावे. मराठीचा सन्मान म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि जनतेच्या भावनांचा सन्मान होय," असा संदेश या निर्णयाच्या अंमलबजावणीतून दिला जात असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

या ऐतिहासिक निर्णयामुळे भाषिक स्वाभिमान, प्रवासी सुरक्षा आणि दर्जेदार सार्वजनिक सेवा यांचा सुंदर संगम घडेल, असा विश्वास व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, शासनाकडून आवश्यक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सर्वतोपरी सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल. सर्व व्यावसायिक चालक, वाहन मालक, परिवहन संघटना आणि नागरिकांनी या उपक्रमात सकारात्मक सहभाग नोंदवून महाराष्ट्र अधिक सुसंवादी, सुरक्षित आणि मराठीमय करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

*लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी... जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी... धर्म, पंथ, जात एक, जाणतो मराठी... एवढ्या जगात माय, मानतो मराठी...*

या कवितेतील भावने प्रमाणेच, व्यवहारिक मराठीचा हा निर्णय केवळ एका नियमाची अंमलबजावणी नसून महाराष्ट्राच्या अस्मितेला, आपुलकीला आणि सर्वसमावेशक संस्कृतीला अधिक बळ देणारा ऐतिहासिक टप्पा ठरेल, अशी भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

## ३० वर्षांनंतर अधिवेशन काळात विधानभवनात शरद पवारांची उपस्थिती

**मुंबई :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी विधानभवनात उच्चाधिकार समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष तथा खासदार शरद पवार, खासदार नारायण राणे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सीमा भागातील लोकप्रतिनिधी आणि सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे, अधिवेशन काळात तब्बल ३० वर्षांनंतर शरद पवार विधानभवनात दाखल झाले.

शरद पवार बैठकीसाठी येणार असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्व आमदार विधानभवनात त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही शरद पवार यांचे स्वागत केले. विधानभवन परिसरात त्यांच्या आगमनाची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावरील सर्वोच्च न्यायालयातील लढाई अधिक प्रभावीपणे लढण्याबाबत चर्चा झाली. राज्य सरकारने हा खटला अधिक ताकदीने मांडण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीत बेळगाव, कारवार, निपाणीसह मराठीबहुल भाग संयुक्त महाराष्ट्रात यावेत, ही महाराष्ट्राची भूमिका कायम ठेवण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याने राज्याची कायदेशीर बाजू आणखी मजबूत करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, ऐतिहासिक पुरावे आणि पुढील रणनीती यावरही चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर शरद पवार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून सातत्याने भूमिका घेतली आहे. मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात यावेत, या मागणीसाठी त्यांनी अनेकदा आवाज उठवला आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या बैठकीत त्यांची उपस्थिती विशेष मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९९६ नंतर प्रथमच अधिवेशन काळात ते विधानभवनात आले. बैठकीत जवळपास अर्धा तास विविध मुद्द्यांवर चर्चा झाली आणि सीमावादाच्या न्यायालयीन लढाईला अधिक गती देण्यावर सर्वपक्षीय नेत्यांमध्ये एकमत झाले.

उच्चाधिकार समितीची बैठक संपल्यानंतर शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विधानभवनातील दालनात सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी कॅबिनेट बैठकीसाठी रवाना होण्यापूर्वी एकनाथ शिंदे यांनी स्वतः कार्यालयात येऊन शरद पवार यांचे स्वागत केले. शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या प्रकृतीचीही विचारपूस करण्यात आली.

यानंतर शरद पवार यांनी विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या आमदारांची स्वतंत्र बैठक घेतल्याची माहिती समोर आली आहे.

शरद पवार विधानभवनात पोहोचताच त्यांच्या पक्षाच्या आमदारांनी आणि नेत्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. त्यांच्या स्वागतासाठी माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, रोहित पाटील, संदीप क्षीरसागर, उत्तमराव जानकर, अभिजित पाटील, राजू खरे, नारायण पाटील आणि बापू पठारे यांच्यासह अनेक आमदार व पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या सर्व आमदारांनी त्यांचे स्वागत करत त्यांना बैठकीसाठी शुभेच्छा दिल्या.

## वाशिम जिल्हा न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल : धुमका-तोंडगाव टोल प्लाझा जप्त करण्याचे आदेश

**वाशिम :** जमीन अधिग्रहणाच्या हक्काच्या मोबदल्यासाठी कायदेशीर लढा देणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाजूने वाशिम जिल्हा न्यायालयाने एक ऐतिहासिक आणि अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला आहे. सरकारी यंत्रणांनी न्यायालयाच्या आधीच्या आदेशांकडे दुर्लक्ष केल्याची गंभीर दखल घेत, मुख्य जिल्हा न्यायमूर्तींनी थेट राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (NHAI) मोठा दणका दिला असून वाशिम जिल्ह्यातील धुमका-तोंडगाव टोल प्लाझा जप्त करण्याचे कडक आदेश जारी केले आहेत.

वाशिम येथील शेतकरी बेबी गर्जे आणि विठ्ठल गर्जे यांची अकृषक जमीन राष्ट्रीय महामार्गासाठी अधिग्रहित करताना, प्राधिकरणाने त्यांना रस्ते व खुल्या जागेचा मोबदला नाकारत केवळ प्लॉटचा आणि तोही बाजारभावापेक्षा अत्यंत कमी दराने मोबदला देऊन त्यांची मोठी फसवणूक केली. या अन्यायाविरोधात गर्जे कुटुंबाने जिल्हाधिकारी आणि न्यायालयात दाद मागत प्रदीर्घ कायदेशीर लढा दिला. अखेर न्यायालयाने या प्रकरणात शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल देत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला वाढीव मोबदला देण्याचे स्पष्ट आदेश दिले. परंतु प्राधिकरणाने मात्र या न्यायालयीन आदेशाची कोणतीही अंमलबजावणी न करता त्याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले.

न्यायालयाच्या आदेशाचे वारंवार उल्लंघन झाल्याने संतप्त झालेल्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मालकीचा तोंडगाव येथील टोल प्लाझा थेट जप्त करण्याचे वॉरंट जारी केले आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांची बाजू मांडणारे वकील उदय देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यायालयाने प्राधिकरणाला शेतकऱ्यांची थकीत रक्कम जमा करण्यासाठी २० जुलै २०२६ ही अंतिम मुदत दिली आहे.

या दिलेल्या मुदतीत जर प्राधिकरणाने पैसे भरले नाहीत, तर २१ जुलै रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन टोल प्लाझा जप्त करण्याची कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. न्यायालयाच्या या धडक आणि आक्रमक निर्णयामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, हा महत्त्वपूर्ण निकाल देशभरातील इतर अन्यायग्रस्त आणि पीडित शेतकऱ्यांसाठी न्यायाचा एक नवा आशेचा किरण ठरणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ जुलै २०२६


## मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल येथे पी.ई. एस. चा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई चे छत्रपती संभाजी नगर स्थित, मिलिंद मल्टिपर्पज हायस्कूल, नागसेन वन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथे स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेचा चा 81 वा वर्धापन दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख अतिथी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डॉ. प्रमोद हिरोडे तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष , मुख्याध्यापक श्री. धन्यकुमार टिळक यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. या अभिवादन प्रसंगी मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत चव्हाण , श्रीमती योजना रामटेके, श्री. हेमंत गायकवाड तसेच मिलिंद इंग्लिश प्रायमरी स्कूल , मिलिंद मराठी प्रायमरी स्कूल आणी मिलिंद हायस्कूल मधील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथी डॉक्टर प्रमोद हिरोडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी पी. ई. एस. च्या माध्यमातून देशातील प्रत्येक समाजातील लोकांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. जेथे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे तेथेच समाज आणि देशाची प्रगती होते असे सांगून भविष्यात विद्यार्थ्यांनी या शिक्षण संस्थेची जबाबदारी घ्यावी असे आवाहन केले. मुख्याध्यापक श्री. धन्यकुमार टिळक यांनी सर्वांना पी.ई.एस. वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देताना सांगितले की, पी.ई.एस.या संस्थेमध्ये शिक्षण घेऊन लाखो व्यक्ती स्वाभिमानाने उभ्या राहिल्या. वर्तमान परिस्थितीत बाबासाहेबांच्या विचारांना संपवण्याचे षडयंत्र चालू असताना बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी डोळ्यांसमोर उच्च ध्येय ठेवून गुणवत्ता दाखवणे आवश्यक आहे तसेच बाबासाहेबांच्या कष्टाची जाणीव ठेवून प्रत्येकच घटकांनी आपले कार्य योग्य रीतीने पार पाडावे असे आवाहन केले. मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले की, बुद्ध, फुले, शाहूंच्या विचारांचा इतिहास लाभलेल्या पी.ई.एस. संस्थेचा सार्थ अभिमान ठेवून विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षित बनावे. श्रीमती रोहिणी राजभोज यांनी प्रास्ताविककेले. याप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थी प्रज्ञा सरोदे , प्रगती हटकर , श्रेयस मुदखेडकर , धम्मदीप कांबळे , प्रियल श्रृंगारे , अपर्णा वाघमारे आणी प्रशिक वानखेडे या विद्यार्थ्यांनी भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पी. ई. एस. या शैक्षणिक संस्थेचे सामाजिक योगदान स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. रामदास मारग, श्रीमती लता श्रीनाथे, श्री. भीमराव गायकवाड, श्री. आरेफ शेख, श्री. योगेश पवार, श्रीमती माधुरी लिंगायत, श्री. विवेक पवार, श्रीमती माया गवई तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. भैय्यासाहेब आमराव, शिल्पा तुपे, श्री. माणिक आहिरे आणि श्री. शरद कांबळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अमृता गायकवाड या विद्यार्थिनींने तर आभार प्रदर्शन पुनम हातोले या विद्यार्थिनीने केले.

## जोपर्यंत जर्मनी बरबाद होत नव्हता

जोपर्यंत जर्मनी बरबाद होत नव्हता,
तोपर्यंत हिटलरमध्ये लोकांना देशभक्ती
दिसत होती,
गर्जणाऱ्या भाषणांच्या आवाजात,
भविष्यातील संकटांची चाहूल हरवत
होती.

राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली,
अभिमानाचा ज्वालामुखी पेटत गेला,
प्रश्न विचारणारा प्रत्येक आवाज,
हळूहळू अंधारात गडप होत गेला.

विजयाच्या स्वप्नांनी भारावलेले
जनसमुदाय,
टाळ्यांच्या गजरात सत्य विसरत गेले,
सत्तेच्या चकाकत्या प्रकाशामागे,
विनाशाचे सावट दडून बसलेले होते.

जेव्हा रणांगणावर रक्त वाहू लागले,
जेव्हा घराघरांत दु:खाचे ढग दाटले,
तेव्हा समजले की अंधभक्तीच्या वाटेवर,
किती भयंकर काटे पेरले गेले.

देशभक्ती म्हणजे द्वेष नव्हे,
देशभक्ती म्हणजे विवेकाची ज्योत;
नेत्यावर प्रेम असावे जरूर,
पण सत्यावर असावी सर्वात मोठी निष्ठा.

इतिहास शिकवतो एकच धडा—
टाळ्यांच्या थाळ्यांच्या गजराने सत्य
बदलत नाही,
नेत्याचे मूल्यमापन त्याच्या घोषणांनी
नव्हे,
तर त्याच्या कृतींच्या परिणामांनी होते.

म्हणून राष्ट्रप्रेम जपा,
पण विचारांची दारे उघडी ठेवा;
कारण जेव्हा प्रश्न विचारणे थांबते,
तेव्हाच विनाशाची सुरुवात होते.

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## गाढव

गाढवाचा स्वभाव
कष्टाळू व शांत
आवाज मात्र भसाडा
मनी त्याच्या खंत

मळकट करडा रंग
लांब लांब कान
जड ओझे उचलून
जीवाचे करतो रान

मनात आले की
गावभर पळतो
खुशीत येऊन
उकिरड्यावर लोळतो

मोकळा सोडला की
बाहेर चरायला जातो
गवत आणि चारा
मिटक्या मारीत खातो

इमाने इतबारे
बजावतो आपले काम
उन असो पाऊस
असो
मुळीच नसतो आराम



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता. महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


# १० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

# D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## धीर कधी सोडायचे नसते

मित्रांनो धीर कधी, सोडायचे नसते.
सुख असो की दु:ख,. टिकणार नसते.

संकटात स्वतःला, आजमावे लागते.
क्षमतांना स्वतःच्या, जाणायचे असते.
सुख दु:ख सोबत, आनंदात बसते.
सदा चिंता कशाची, करायची नसते.

मित्रत्वाची उणीव, संकटात भासते.
आनंदात मित्राची, किंमतच नसते.

धीर धर तरुणा, ध्येय तुला दिसते.
घेतलेला शपथ, तोडायचे नसते.

शत्रु असो की मित्र, यशासाठी कसते.
जीवनात गाफील, राहायचे नसते.

नागेशचे शब्दच, अन्यायाला डसते.
संकटाचे शत्रूला, मागमूस नसते.

**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ जुलै २०२६


## मह्या बाप

मह्या बाप , लय जिगरबाज होता.
हाडांमासाच्य माणसाच्या हक्कासाठी झगडणारा होता.
अथक संघर्ष परिश्रमातून ,
संविधान लिहिले.
म्हणूनच.
आज, लुळे ,लंगडे ,आंधळे .
पहाड चढले.
मात्र काहींची चूक,
षडयंत्राच्या जाळ्यात गुरफटले.
गोमाश्याणी पछाडले ,
तरीही,मानही न हलविता.
ते चक्क ओझे वाहणारे
बैलोबा झाले.
काहींनी मान् झटकली,
जू , जोखंडे फेकली.
ठीस फिस करीत ,
एसन तोडून
शेपटीचां गोंडा वर करून .
बिनधास्त,
फुलेवाड्याकडे पळाले.
शिकले सावरले,
मोठे झाले.
काही गद्दार जाहले.
बापाला बाप न मानणारे ,
वर्गीकरण
करायला निघाले .
संविधानानेच,आमदार होऊन
कोल्होबसारखेच...
बोरं आंबट.
अंधाराच्या गर्तेत जाऊन,
मांगपण ,
सांगत आहेत.
व्यवस्थेच्या उतरंडीत
आजही आड सोडा,
मसनवटे नाहीत.
आजवर लोटले तरीही,
विषमतेच्या जहरी पंगतीत .
हक्क सांगत बोंबलत,
फिरताहेत.!!!
बिनबुडाचे पेंधे होऊन,
त्यातील काहीजण मात्र,
बापाला बाप मन्हताहेत.
तेव्हढे मात्र थोडे खरे...
पण ,काही गद्दार
खऱ्या बापाला बाप म्हणायला ,धजावत नाहीत.
तोंड लपवतात,
व्यांगी महारोग्यासारखे.
सांसर्गीक मरिजसारखे.
ऐतिहासिक भाषणात ,
ठासून ठाम सांगतोय
आमचा बाप.
शिक्षण वाघणीचे दूध आहे .
पण ,तुम्हाला लाथ झाडनाऱ्या
आणि बेफाम पळणाऱ्या
गधडीच्चे दूध पिण्याची सवय.
आणि निर्लज्जपणे दोष देता !,
आनंदात खिदळणाऱ्या
अन्याय विरोधात
अन् न्यायिक हक्क,
आंदोलन करणाऱ्या
सिंहाच्या बछड्यांना.!!
तुम्हीच,दोषी.?!
अंगावर फाटके कपडे ठेवलीत!
आज घटकेला
फाटकी नियत नको ,
लायकी शाबूत ठेवा.
हवा उलटी वाहते.
गरिबी परिस्थिती असेलही,
पण फसवणुकीपासून
सावध राहा.
नेत्याच्या,तकलादू
आश्वासनांनी
हरामी पैशाने कायमचे.
श्रीमंत होता येत नसते .
बापाच्या विश्वासानेच,
होईल भले,
श्रीमंत होण्यासाठी,
चांगलं मनही लागते.
संविधानिक बापानी,
तशी, सोयही केली.
आज,
तुमचे हात रिकामे असतील.
पण ,कुणाच्या अश्रूंचे कारण बनू नका .
खरा सन्मार्ग
सत्यधर्म विचार.
अन माणुसकी जपा,
चिकित्सक मर्म ,
सत्यपडताळणी आकडेवारी
हाच मार्ग खरा.
मह्या,
जगविख्यात बापानी दिलाय......
त्या दीपपथदर्शक रस्त्यांनी
जाण्यातच चांगभले
अन् ,मांगभले.
सांगणे बापाचे .. मह्या बापाचे..

**- मधुबानंदा प्रधान**
**अकोला**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी: दुरावस्थेमुळे पालकांमध्ये चिंता



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी या शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत वर्ग आहेत विद्यार्थी संख्या ही १५१ आहे अजून संख्या वाढण्याची शक्यता आहे असे शिक्षकांनी सांगितले जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक बनत चालली आहे. शाळेची इमारत मोडकळीस आल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.सद्याच्या दररोजच्या पावसामुळे छत गळत आहे,छत थोडे खाली आले आहे .चारही भिंतींवर ओलावा पसरल्यामुळे तडे जाण्याची शक्यता आहे आणि वर्गखोल्या पुर्ण पाण्याने ओल्याचिंब झाल्या आहेत एकच वर्गखोली चांगली आहे दुरावस्था यामुळे विद्यार्थी व शिक्षक जीव मुठीत धरून शिक्षण अध्ययन आणी अध्यापन करत आहेत.आज स्वयंपाकी ताई झाडू मारत होती व काही विद्यार्थी अवतीभोवती उभे असताना शाळेचा छत त्यांच्या डोक्यावर पडतांना थोडक्यात बचावले.याशिवाय शाळेत स्वच्छतागृहाची पुरेशी सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.विशेषतः मुलींसाठी ही समस्या अधिक गंभीर असून त्यांच्या आरोग्याबरोबरच शिक्षणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.मूलभूत सुविधांच्या अभावामुळे पालकांमध्ये आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शासन विविध योजना राबवत असताना ठाकरवाडीसारख्या आदिवासी दुर्गम भागातील शाळा मात्र आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. स्थानिक ग्रामस्थांनी आणि पालकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे निवेदने देऊन शाळेची दुरुस्ती, नवीन इमारत तसेच स्वच्छतागृहाची मागणी केली आहे. मात्र अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही.विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व शिक्षण विभागाने या समस्येची तातडीने दखल घेऊन शाळेची नवीन इमारत उभारणे, स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देणे काही वर्गखोल्या दुरुस्ती करणे आणि आवश्यक मूलभूत सुविधा त्वरित पुरविणे ही काळाची गरज आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. गावाचे सरपंच दिपक चांडे, ग्रामसेविका भारती पाटील यांनी सकाळी शाळेची पाहणी केली व पाहणी केल्यानंतर सांगितले की,तातडीने आम्ही पंचायत समिती खुलताबाद येथे प्रस्ताव देऊ,पण मुलांच्या स्वच्छतागृह बाबत काही सकारात्मक चर्चा झाली नाही.दुपारनंतर जिल्हा परिषद सदस्य बर्डे यांनी सुद्धा शाळेवर मदतीसाठी धाव घेतली शाळेची पाहणी केल्यानंतर शाळेची व स्वच्छतागृहाची दुरावस्था आढळून आली.व शाळेचे रजिस्टर चेक केले व शाळेचे मुख्याध्यापक लहाने सतत गैरहजर असल्याचे आढळून आले.आणी शाळेची दुरावस्था पाहून त्यांनी शाळेतील शिक्षकांना तातडीने प्रस्ताव ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हा परिषद यांना पाठवण्याचे सांगितले व बर्डे म्हणाले की,माझ्याकडून जेवढी मदत होईल तेवढी मी मदत करेन आणी शाळेची अवस्था चांगली करा त्याचबरोबर पालकांनी मुख्याध्यापक लहाने यांची तात्काळ बदली करून दुसरे शिक्षक द्यावे यावर जोर धरला यांच्यासोबत शाळेतील शिक्षक श्री भालेराव , श्री गालफाडे , श्रीमती घोरपडे, श्रीमती साबळे आणी पालक व ग्रामस्थ
बाळू म ,पुनम मेंगाळ, भाऊसाहेब गावंडे, बबन कातवारे तुकाराम बांगारे प्रल्हाद मेंगाळ ईश्वर कातवारे वाळूबा मधे सनीराम गावंडे अर्जुन मधे नवनाथ आगिवले कैलास कतवारे , दिपक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पवार, उपाध्यक्ष वंदना मेंगाळ इत्यादी उपस्थित राहून चिंता व्यक्त केली आहे.


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ जुलै २०२६


# इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या उमेदवारांना आवाहन

**बीड, दि.७ (भगवंत पाळवदे)** : राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या सर्वांगीण कल्याणासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत विविध १३ उपकंपन्यांमार्फत बीड जिल्ह्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत, असे आवाहन महामंडळाचे बीड जिल्हा व्यवस्थापक बी. एस. भोसले यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या महामंडळाअंतर्गत मुख्य महामंडळ, कंपनी व १३ उपकंपन्या मार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी २० टक्के बिज भांडवल कर्ज योजना, १ लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना अशा एकुण सहा योजना राबविण्यात येत आहेत. यापैकी १ लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना या पुर्णपणे ऑनलाईन स्वरुपाच्या असुन इतर मागास प्रवर्गातील पात्र अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. उर्वरीत बिजभांडवल योजना हि ऑफलाईन स्वरुपाच्या असून त्याचे अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. याबात अधिक माहितीकरीता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, नगर रोड, बीड दुरध्वनी क्रमांक ०२४४२-२३२६२४ येथे संपर्क साधावा, असेही कळविले आहे

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

**बीड, (भगवंत पाळवदे)** : राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना आता आधार कार्ड आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या क्रमांकाशिवाय कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज, जे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळेल. जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता, एका किंवा अनेक बँकांमधील मिळून जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंतची मुद्दल व व्याजासह थकबाकी थेट कर्ज खात्यात जमा करून शेतकरी कर्जमुक्त केले जातील. तसेच ज्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची उचल करून वेळेत परतफेड केली आहे, त्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम आपला आधार कार्ड क्रमांक मोबाईल नंबरशी लिंक करणे आवश्यक आहे. आधार लिंक झाल्यानंतर ॲग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीनंतर मिळणारा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आपल्या पीक कर्ज खाते असलेल्या बँकेत जमा करावा. ज्या शेतकऱ्यांकडे आधीपासूनच हा नोंदणी क्रमांक उपलब्ध आहे, परंतु त्यांनी तो अद्याप बँकेत जमा केलेला नाही, त्यांनीही तो त्वरित बँकेकडे सुपूर्द करावा. या क्रमांकाशिवाय कोणत्याही परिस्थितीत योजनेचा लाभ खात्यात जमा होणार नसल्याने शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. असेही जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी कळविले आहे





